# सहाय्यक निबंधक ,सहकारी संस्था , विक्रमगड , जि.पालघर

यांचे कार्यालय

विजय मेडीकलच्यावर, वाडा रोड, विक्रमगड जि.पालघर, पिन - ४०१६०५

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७अ (ब-१)(ड)अंतर्गत आदेश

जा.क्र./सनिवि/जंकास /कलम७७ (अ) (ब-१)(ड)/ /     /२०१६

दिनांक - २६ /०८ /२०१६

**वाचावे :-** १)  , महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ आय व कलम ७७ अ मधील तरतुद.

२) महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४

ज्याअर्थी **दादडे विभाग आदि. जंगल कामगार सह. संस्था मर्या. मु. दादडे, ता.विक्रमगड,** जि. **.पालघर** ( यापुढे संस्था असे वाचावे ) ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ अंतर्गत नोंदणीकृत सहकारी संस्था आहे.सदरच्या संस्थेचा नोंदणी क्रमांक टीएनए/पीआरडी/एस/२०८/ ६४ , दि. २५/०२/१९६४ असा आहे, व ती या कार्यालयाच्या अखत्यारीत येते आणि

ज्याअर्थी, दादडे विभाग आदि. जंगल कामगार सह. संस्था मर्या. मु. दादडे, ता.विक्रमगड, जि. पालघर ( यापुढे संस्था असे वाचावे ) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० ( यापुढे कायदा असे वाचावे ), महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम १९६१ ( यापुढे नियम असे वाचावे ), या संस्थेचे नोंदणीकृत उपविधी तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार संस्थेचे कामकाज चालविले जाणे आवश्यक आहे आणि.

ज्याअर्थी, संस्थेच्या कार्यकारी मंडळाची मुदत संपलेली असल्याने समिती गठीत होईपर्यंत दैनंदिन कामकाज करण्याकरीता प्राधिकृत अधिकारी यांची नेमणुक करणे आवश्यक आहे आणि,

ज्याअर्थी संस्थेचे संपुर्ण कामकाज ठप्प झालेले आहे व व्यवस्थापकीय पोकळी निर्माण झाली आहे आणि,

त्याअर्थी संस्थेचे दैनंदिन कामकाज करण्यासाठी तात्काळ प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक असल्याचे ,माझे मत झाल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) (१) मधील परतुक (२) नुसार कारणे दाखवा नोटीस देण्याची आवश्यकता नाही अशी माझी खात्री झालेली आहे यास्तव पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे .

### -: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार मी अनिल देवकर, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, **विक्रमगड** तालुका, विक्रमगड जि. पालघर, **दादडे विभाग आदि. जंगल कामगार सह. संस्था मर्या. मु. दादडे, ता.विक्रमगड, जि. .पालघर** या संस्थेच्या दैनंदिन कामकाजाकरिता पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक झालेने, संस्थेचे दैनंदिन कामकाज करण्यासाठी श्री.जे.टि.माढे (क. लिपीक अधीन ले.प.स.सं.जव्हार) यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे.

नवनियूक्त प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेच्या दप्तराचा, मालमत्तेचा व दावायोग्य कागदपत्रांचा संपूर्ण पदभार घेवून अहवाल या कार्यालयास सादर करावा तसेच त्यांनी पदभार घेतल्यापासून

(कृ. मा. पहा)

Scanned by CamScanner

सहा महिन्यांत नवीन समितीची निवडणुक घेवुन नवीन समितीने पद्भार घेण्याची दृष्टीने आवश्यक व्यवस्था करावी.

सदरचा आदेश महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (ब-१)(ड) अन्वये आज दि. २६ /०८/२०१६ रोजी माझी स्वाक्षरी व शासन मुद्रेसह निर्गमित केला असे.

(अनिल देवकर)
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था विक्रमगड
विक्रमगड ,जि. पालघर

ठिकाण :- विक्रमगड
दिनांक :- २६/०८/२०१६.

प्रति,

१ चेअरमन / सचिव
दादडे विभाग आदि. जंगल कामगार सह. संस्था मर्या. मु. दादडे, ता.विक्रमगड, जि. पालघर

२. श्री.जे.टि.माढे (क. लिपीक अधीन ले.प.स.सं.जव्हार) तथा प्राधिकृत अधिकारी दादडे विभाग आदि. जंगल कामगार सह. संस्था मर्या. मु. दादडे, ता.विक्रमगड, जि. पालघर

३. शाखाधिकारी, दि ठाणे जिल्हा म. सह. बॅक लि. ठाणे, शाखा .विक्रमगड, जि.पालघऱ यांना कळविण्यात येते की सदर संस्थेचे बॅक खाते तात्काळ प्राधिकृत अधिकारी यांचे नावे करण्यात यावे.

४ लेखापरीक्षक सहकारी संस्था जव्हार,जव्हार जि.पालघर

प्रत माहिती करीता सविनय सादर

२. मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे

(अनिल देवकर)
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था विक्रमगड
ता.विक्रमगड, जि.पालघऱ

Scanned by CamScanner